महाराष्ट्र शासन

सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, पुणे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्व्हे नं.१०४/१०५ येरवडा पोलीस स्टेशनसमोर, विश्रांतवाडी रोड,पुणे-०६
दुरध्वनी -०२०-२९८०९९३७ Email ID -adobcpune२०२३@gmail.com

जा.क्र. ससंइमाबकपुणे/भासाशि/महाडीबीटी/Against Cap /२०२५-२६/ 220 दि.२०.०२.२०२६

शुध्दीपत्रक

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित / कायम विनाअनुदानित व्यावसायिक /
बिगर व्यावसायिक कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये (पुणे जिल्हा).

विषयः भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परिक्षाव्दारे (कॅप) प्रवेश घेतल्या असल्याबाबतच्या अटींची सक्ती न करणेबाबत.

संदर्भ: १. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे शासनपत्र शिष्यवृत्ती-१७/प्र.क्र.१३/शिक्षण दि.०१.०६.२०२०

२. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. शिवृत्ती-२०२३/ प्र.क्र.८३/शिक्षण दिनांक : २० जून, २०२५

३. या कार्यालयाचे पत्र क्र.१०९६ दि.२९.०८.२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून, संदर्भिय शासनपत्र क्र.१ अन्वये ज्या विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देखील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेची (कॅप) सक्ती करण्यात येऊ नये असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ मधील शासन पत्रास अनुसरून या कार्यालयाकडिल संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये यापुर्वी कळविण्यात आले होते की, "भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) योजनेसाठी विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांना लागू राहील. याशिवाय सदर प्रवेश प्रकिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर (Against Cap) प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना (उत्पन्न मर्यादा २.५ लक्ष) देखील सदर योजनेचा लाभ

घेता येईल. सदर बाब केवळ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) साठी लागू आहे."

परंतू संदर्भ क्र.३ मधील शासन निर्णयातील परिशिष्ट ब मधील मुद्दा क्र. १४ अन्वये "सदर योजनेचा लाभ राज्य शासनाच्या अथवा तत्सम प्राधिकृत यंत्रणेच्या केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारेच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. तसेच मान्यताप्राप्त महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतला असल्यास व सदर अभ्यासक्रमाच्या शुल्क रचनेस राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क समितीची मान्यता प्राप्त असल्यासच लाभ देय राहील. **कोणत्याही अभ्यासक्रमास व्यवस्थापन कोटा, एनआरआय कोटा तसेच स्पॉट ॲडमिशन प्रक्रिया इत्यादी अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय राहणार नाही.**" असे नमूद केलेले आहे.

त्यामुळे शासनाची केंद्रीभुत प्रवेश प्रकिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर (Against Cap) प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) ही योजना लागू करणेबाबत शासन स्तरावर मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. शासन स्तरावरून पुढील स्पष्ट निर्देश/सुचना प्राप्त होईपर्यंत संदर्भ क्र.३ मधील पत्र रद्द समजण्यात यावे.

सबब सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (Post Matric Scholarship) योजनेंतर्गतर अर्ज सादर करताना संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयातील अटी व शर्तींचे काटेकोर पालन करून अचित कार्यवाही अनुसरण्यात यावी.

(प्रदिप संकपाळ)
सहायक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण, (प्रादेशिक) विभाग पुणे.